<u>जिल्हा नियोजन समिती कार्यालयाकरिता iPAS या संगणकीय प्रणालीची अंमलबजावणी करणे व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांकः डिएपी-१०१९/प्र.क्र.१६३/का.१४८१
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांकः १८ सप्टेंबर, २०१९

<u>वाचा:</u>

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र: सीओएम-१००१/प्रक्र.१७४/०१/३९, दि. २९.१०.२००१
२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक: एफएनएस-३३०५ / प्र.क्र१४२ (अ) / का.१४२६, दि. १८.१०.२००६
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: मातंसं / नस्ती-२०१० / प्रक्र.३४ / ३९, दि. १८.०६.२०१०.
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: मातंसं-२०११/प्रक्र.१२५/३९, दि. २३.०९.२०११.
५) माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, शासन परिपत्रक क्रमांक : मातंसं -०६० / ३ / २०१७, दि. २९.०१.२०१८.
६) माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, शासन परिपत्रक क्रमांक: मातंसं -०६० / ३ / २०१७ /२, दि. १९.०५.२०१८ व पूरकपत्र दि. ०४.०८.२०१८.

<u>प्रस्तावना:-</u>

महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम, १९९८ मधील तरतूदींनुसार राज्यात प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा नियोजन समिती घटीत करण्यात आल्या आहेत. जिल्हा नियोजन समितीचे पदसिद्ध सदस्य सचिव म्हणून संबंधित जिल्हाधिकारी यांना जिल्हा वार्षिक योजनांतर्गत निधीचे वितरण करणे, प्रशासकीय मान्यता प्रदान करणे व निधीचे पुनर्विनियोजन करणे इ. कामांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या व्यतिरिक्त खासदार स्थानिक विकास कार्यक्रम, आमदार स्थानिक विकास कार्यक्रम, डोंगरी विकास कार्यक्रम, मानव विकास कार्यक्रम व इतर कार्यक्रम / योजनांतर्गत घ्यावयाच्या कामांना प्रशासकीय मान्यताही जिल्हाधिकारी यांचेकडून देण्यात येते.

२. जिल्हा नियोजन समिती कार्यालयामार्फत जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत तसेच विविध कार्यक्रम / योजनांतर्गत मंजूर करण्यात येणाऱ्या कामांच्या माहितीचे संगणकीकरण करुन लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान प्रशासन करण्याच्या दृष्टीने, तसेच जिल्हा वार्षिक योजनांतर्गत कामांचे जिल्हा नियोजन समिती व कार्यकारी समिती मार्फत करण्यात येणारे संनियंत्रण परिणामकारक होण्याच्या दृष्टीने जिल्हा नियोजन समिती कार्यालयातील सर्व दस्तावेज संगणकीकृत करुन कागदरहीत कामकाज करण्यासाठी संगणकीय प्रणाली विकसित करण्याची आवश्यकता होती. ही बाब विचारात घेऊन जिल्हा नियोजन समिती कार्यालयासाठी एक सर्वंकष अशी “वेब बेस्ड” संगणकीय प्रणाली “iPAS -Integrated Planning Office Automation System”, नाशिक जिल्ह्यात पथदर्शी प्रकल्प म्हणून विकसित करण्यात आलेली आहे.

३. जिल्हा स्तरावर लोकप्रतिनिधी आणि कार्यान्वयीन यंत्रणा इंटरनेटद्वारे अर्थात “iPAS -Integrated Planning Office Automation System” द्वारे जोडल्या जाणार असून, जिल्हा नियोजन समितीकडून संनियंत्रित केल्या जाणाऱ्या कार्यक्रम / योजनांची अद्ययावत माहिती एकत्रितरित्या राज्यस्तरावर उपलब्ध होणार असल्याने त्या आधारे माहितीचे विश्लेषण करुन कार्यक्रम/योजना प्रभावीपणे राबविण्यास मदत होईल. तसेच महसूल विभागस्तरावर देखील संनियंत्रण करणे सुलभ होणार आहे. या पार्श्वभूमीवर “वेब बेस्ड” “iPAS -Integrated Planning Office Automation System” राज्यातील सर्व जिल्ह्यात राबविण्यासाठी नियोजन विभागाच्या -प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या दिनांक ०२.०८.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. तेव्हा, “iPAS -Integrated Planning Office Automation System” ही “वेब बेस्ड” संगणकीय प्रणाली राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये राबविणे व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णयः-

जिल्हा नियोजन समिती कार्यालयामार्फत संनियंत्रित करण्यात येणाऱ्या / राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रम / योजनांतर्गत प्रशासकीय मान्यता, निधी वितरण, कामांचे सनियंत्रण व प्रभावी अंमलबजावणीसाठी नाशिक जिल्ह्यात पथदर्शी प्रकल्प म्हणून विकसीत करण्यात आलेली “iPAS -Integrated Planning Office Automation System” संगणकीय प्रणाली राज्यातील सर्व जिल्ह्यांत सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून राबविण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच त्यासाठी येणाऱ्या एकुण रु. २८८.५२ लक्ष इतक्या खर्चास खालील प्रमाणे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

अ. क्र.	बाब	अपेक्षित खर्च (रु. लक्ष)
१.	“iPAS -Integrated Planning Office Automation System” ही संगणकीय प्रणाली सर्व जिल्ह्यात लागू करणे, त्या अनुषंगाने, जिल्हानिहाय माहिती संचयीका, जिल्हास्तरीय पोर्टल आणि “मोबाईल ॲप” यामध्ये आवश्यक ते बदल करणे, जिल्हापातळीवर संबंधीत अधिकारी/ कर्मचारी यांचे प्रशिक्षण आणि तांत्रीक सहाय्य करणे, प्रणालीचे सुरक्षितता तपासणी इ. तसेच राज्य आणि विभागस्तरीय सनियंत्रणकरीता पोर्टल विकसीत करणे	१६९.३२
२.	“iPAS -Integrated Planning Office Automation System” ही संगणकीय प्रणाली माहे सप्टेंबर, २०१९ ते ऑगस्ट, २०२२ या ३ वर्षाकरीता “सर्व्हर होस्टींग” आणि सर्व्हर देखभाल दुरुस्ती इ.	११९.२०
एकूण		**२८८.५२**

२. नियोजन विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीने मान्यता दिल्याप्रमाणे नाशिक जिल्ह्याकरीता पथदर्शी प्रकल्प म्हणून जिल्हा वार्षिक योजना व इतर महत्त्वाचे कार्यक्रम/योजनांच्या परिणामकारक संनियंत्रणासाठी विकसीत करण्यात आलेली “iPAS -Integrated Planning Office Automation System” ही संगणकीय प्रणाली राज्यातील सर्व जिल्ह्यात राबविण्याचे काम ई.एस.डी.एस. सॉफ्टवेअर सोलुशन प्रा. लि., नाशिक” या कंपनीमार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. माहिती व तंत्रज्ञान विभागाने "सर्व्हर होस्टींग" व त्याची देखभाल-दुरुस्तीचे दर ३१ मार्च, २०२१ पर्यंत निश्चित केले असल्याने "iPAS -Integrated Planning Office Automation System" प्रणालीकरीता उक्त दर लागू राहतील. ३१ मार्च, २०२१ नंतर माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून वेळोवेळी निर्धारीत केल्यानुसार याबाबतीत सुधारित दर अनुज्ञेय राहतील. आवश्यकतेनुसार नियोजन विभागाकडून याबाबतीत वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात येतील.

४. नियोजन विभागाकडून सर्व जिल्ह्यांकरीता राबविण्यात येत असलेली "iPAS -Integrated Planning Office Automation System" या संगणकीय प्रणालीची सर्व जिल्ह्यांत अंमलबजावणी केल्यानंतर त्या पुढील ६ महिन्यांपर्यंत प्रणालीची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी "ई.एस.डी.एस. सॉफ्टवेअर सोलुशन प्रा. लि., नाशिक" या कंपनीची असेल. त्यानंतर "iPAS -Integrated Planning Office Automation System" प्रणालीच्या देखभाल व दुरुस्तीबाबत स्वतंत्रपणे व्यवस्था करण्यात येईल.

५. नियोजन विभागाकडून राबविण्यात येत असलेल्या "iPAS -Integrated Planning Office Automation System" प्रणालीसंदर्भात राज्यातील सर्व जिल्हा नियोजन अधिकारी व त्यांच्या अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत असून, त्यांच्यासाठी एक सर्वंकष प्रशिक्षण कार्यक्रमही आयोजित करण्यात येईल.

६. नियोजन विभागाकडून सर्व जिल्ह्यांकरीता राबविण्यात येत असलेल्या "iPAS -Integrated Planning Office Automation System" या संगणकीय प्रणालीसाठी निधी खालील लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित करुन खर्च करण्यात येईल.

नियोजन विभाग, मागणी क्र. ओ- ७,

३४५१, सचिवालयीन आर्थिक सेवा,

०९०, सचिवालय,

(०१) (नियोजन विभाग),

(०१) (१०) ई-गव्हर्नन्स प्रकल्पाची अंमलबजावणी (कार्यक्रम) (३४५१२७७३)
१७, संगणक खर्च.

७. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रस्तुत शासन निर्णय उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०९१८१५२५०९५५१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIJESING FATTESING VASAVE

Digitally signed by VIJESING FATTESING VASAVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5494d2ad3a3bc5ddd66daf9a8f17ceec5e2d7d4b6a8bba99c51d275801bcdf1b, cn=VIJESING FATTESING VASAVE
Date: 2019.09.19 13:03:37 +05'30'

(वि. फ. वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,

२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३) सर्व मंत्री / राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा. कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ,
५) मा. विरोधी पक्ष नेते (विधानसभा / विधानपरिषद),
६) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा) महाराष्ट्र, मुंबई,
७) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा) महाराष्ट्र, नागपूर,
८) शासनाचे मुख्य सचिव,
९) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
१०) सदस्य सचिव, उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ, मुंबई,
११) सदस्य सचिव, मराठवाडा विकास मंडळ, औरंगाबाद.
१२) सदस्य सचिव, विदर्भ विकास मंडळ, नागपूर.
१३) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई.
१४) अधिदान व लेखाधिकारी, महाराष्ट्र शासन, मुंबई,
१५) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६) सर्व विभागीय आयुक्त,
१७) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
१८) सर्व मुख्य अभियंता (जलसंपदा प्रादेशिक विभाग) ,
१९) सर्व मुख्य अभियंता (सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग),
२०) सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती,
२१) सर्व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळे,
२२) सर्व अधिक्षक अभियंता, जलसंपदा मंडळे,
२३) नियोजन विभागातील सर्व सह सचिव / उप सचिव,
२४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२५) संचालक अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
२६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२७) सर्व उप आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्तांचे कार्यालय,
२८) सर्व जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
२९) जिल्हास्तरीय अंमलबजावणी यंत्रणांचे प्रमुख,
३०) नियोजन विभागातील सर्व कार्यासन अधिकारी,
३१) निवड नस्ती, का. १४८१.
